**खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने घेणे बाबत.**

## जाहिर नोटीस

ज्या अर्थी सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने घेण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र. संकिर्ण/03/प्र.क्र.34/अ-2 दिनांक 12 मे 2015 व शासन परिपत्रक क्र. एलक्युएन-01/2017 प्र.क्र. 12/अ-2 दि. 25 जानेवारी 2017 नुसार सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी वाटाघाटीसाठी थेट खरेदी पध्दतीने ताब्याची शक्ती राज्य शासनास प्रदान करण्यात आली आहे.

ज्या अर्थी राज्य शासनाने शासन परिपत्रक क्र. एलक्युएंन-01/2017 प्र.क्र. 12/अ-2 दि. 25 जानेवारी 2017 मधील 1 (ब) नुसार सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याकरीता मा.उपविभागीय अधिकारी, सेलू ता.सेलू जि.परभणी यांची नियुक्ती केली आहे.

आणि ज्या अर्थी निवडी (खु.) ता.जिंतूर जि.परभणी ते आडगांव दराडे ता.सेलू जि.परभणी गावांसाठी नवीन रस्ता तयार करण्यासाठी खालील जमीन संपादनाची विभागास आवश्यकता आहे. असे सार्वजनिक विभाग, परभणी यांचे मत आहे.

ज्या अर्थी शासन परिपत्रक क्र. एलक्युएन-01/2017 प्र.क्र. 12/अ-2 दि. 25 जानेवारी 2017 प्रमाणे मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी उपविभागीय अधिकारी, सेलू ता.सेलू जि.परभणी या सोबतच्या अनुसुचित उल्लेख केलेल्या जमीनीमध्ये हितसंबंध आणि अधिकार असणाऱ्या सर्व व्यक्तींना या सोबतच्या अनुसुचित उल्लेख केलेल्या जमीनी उक्त प्रयोनार्थ खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने का घेवू नये या संबंधी दिनांक 9 /03/2020 पुर्वी खालील सही करणाऱ्यास लेखी स्वरुपात कारण दाखविल्याबद्दल फर्मावणारी नोटीस देत आहे. ज्या व्यक्तीची सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीच्या तारखे पासून दिनांक २५/03/2020 पुर्वी भेटीची वेळ ठरवून कामाच्या

दिवशी (सकाळी 9.45 ते दु. 5.45 वा) वेळेत खालील सही करणाऱ्या अधिकाऱ्यास समक्ष जातीने किंवा कादेशिर मुखत्यारा मार्फत पुराव्याचे पुर्ण कागदपत्रे घेऊन हजर राहता येईल.

(उमाकांत पारधी)
उपविभागीय अधिकारी
सेलू जि.पभणी.

## अनुसुची

गाव : आडगाव दराडे ता. सेलू जि. परभणी

| अ.क्र. | भुधारकाचे नांव | गट क्र. | भुसंपादन करावयाचे क्षेत्र | |
|---|---|---|---|---|
| | | | हेक्टर | आर |
| 1. | दादाराव पुंजाजी गेरकर | 189 | 0 | 30.2 |
| 2. | प्रभाकर बाबाराव गेरकर | 217 | 0 | 19.9 |
| 3. | परमेश्वर दादाराव गेरकर | 219 | 0 | 12.2 |
| 4. | साहेबराव निवृत्ती जाधव | 192 | 0 | 4.7 |
| | | एकूण | 0 | 67.0 |

(उमाकांत पारधी)
उपविभागीय अधिकारी
सेलू जि.पभणी.

**प्रत :**

1) मा.जिल्हाधिकारी साहेब, परभणी यांना माहितीसाठी सविनय सादर.
2) मा.कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, परभणी यांना माहितीसाठी व प्रसिध्दीसाठी सस्नेह रवाना.
3) मा.सहा.अभियंता (श्रेणी-1), सा.बां. उपविभाग, सेलू / मा.सहा. अभियंता (श्रेणी-1), सा.बां. उपविभाग, जिंतूर यांना कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल सादर करण्यासाठी रवाना.
4) मा.तहसिलदार, सेलू / तहसिलदार, जिंतूर यांना कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल सादर करण्यासाठी रवाना.
5) तलाठी, आडगाव दराडे / तलाठी निवडी (खु.) यांना कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल सादर करण्यासाठी रवाना.
6) ग्रामसेवक, ग्रा.पं. आडगाव दराडे / ग्रामसेवक, ग्रा.पं.निवडी (खु.) यांना कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल सादर करण्यासाठी रवाना.
7) स्थानिक दोन वृत्तपत्रात प्रसिध्दीसाठी रवाना.